☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट / 308 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 11 / 08 / 2025

# 1)खुनाचा प्रयत्न :–

**हिमायतनगर :–** दिनांक 10.08.2025 रोजी 13.30 वा. ते 14.00 वा.चे दरम्यान, **महात्मा फुले चौक, पळसपूर टी पॉईट हिमायतनगर ता. हिमायतनगर जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे परमेश्वर रंगराव डाके, वय 28 वर्षे, रा. सराफा गल्ली, हिमायतनगर याने फिर्यादीस मोटार सायकल मागीतली असता फिर्यादीने मोटार सायकल न दिल्याचा राग मनात धरून फिर्यादीचे वडापाव गाडयाजवळ येवून फिर्यादीस शिवीगाळ करीत असताना फिर्यादीचा भाऊ संजय व्यंकटराव जाधव, हा शिवीगाळ का करत आहेस असे विचारले असता फिर्यादीचे भावास गळयावर, नाकावर मारून गंभीर दुखापत करून खुनाचा प्रयत्न केला. व फिर्यादीस लाथाबुक्याने मारहाण केली. वगैरे **फिर्यादी परमेश्वर व्यंकटराव जाधव, वय 31 वर्षे, व्यवसाय वडापाव चालक रा. फुले नगर, हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 186 / 2025 कलम 109,115(2),352,351(2),296 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री वाठोरे, मो. नं. 9923282854** हे करीत आहेत.

# 2)घरफोडी :–

**माळाकोळी :–** दिनांक 09.08.2025 रोजी 23.00 वा.ते दिनांक 10.08.2025 रोजी 05.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी मौ. आडगा ता. लोहा जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे झोपले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे पाठीमागील भिंतीच्या विटा काढून घरात प्रवेश करून घरातील लोखंडी व लाकडी पेटी शेतामध्ये घेवून जावून पेटयाचे कुलुप तोडून पेटयामधील नगदी 6,00,000 / –रू व सोन्याचे दागिने 75,000 / –रू चा मुद्देमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी बालाजी तुकाराम सुरनर, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. आडगा ता.लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 152 / 2025 कलम 331(4),305 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / चामले, मो.नं. 8308472007** हे करीत आहेत.

# 3)अवैध रेती चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 10.08.2025 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **वाडी पाटी विष्णुपुरी रोडवर, नांदेड येथे,** यातील आरोपी नामे नंदकिशोर दशरथ पवार, वय 23 वर्षे, व्यवसाय चालक रा. खरबी ता.लोहा हा आपले ताब्यातील टाटा हायवा एमएच / 23 एयु–3424 किंमत 15,00,000 / –रू मध्ये चार ब्रास रेती किंमत 20,000 / –रू विना परवाना बेकायदेशिररित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतूक करीत असताना मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ / 3139 धम्मपाल ग्यानोबा कांबळे, नेम. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांचे फिर्यादवरून **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 762 / 2025 कलम 303(2) बीएनएस–2023 कायदा सह कलम 48(7),(8)ज.म.अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2565 जेनकुट, मो. नं.** 8007221700 हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड